# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

( पूर्वीचे पुणे विद्यापीठ )

**परिपत्रक क्र.३०१/२०२२**

या परिपत्रकाव्दारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतुदीनुसार विविध प्राधिकरणांतून व्यवस्थापन परिषदेवर निवडून आलेल्या सदस्यांचा कार्यकाल दिनांक ३१ ऑगस्ट, २०२२ रोजी संपुष्टात आलेला आहे. परंतु या कार्यकालात व्यवस्थापन परिषदेच्या सभांमध्ये विविध ठरावान्वये विविध विषयांसाठी समित्या नियुक्त्या केल्या होत्या. कित्येक समित्यांचे अद्यापही कामकाज सुरु असून सदर समित्यांचे कामकाज संपुष्टात येईपर्यंतच्या कालावधीकरिता समित्यांवरील सदस्यत्व कार्यरत राहणेबाबतच्या प्रस्तावावर मा.व्यवस्थापन परिषदेने दिनांक २९ ऑगस्ट, २०२२ रोजी सभेमध्ये ठराव क्र.म:३८१/२९०८२२ अन्वये खालीलप्रमाणे ठराव केलेला आहे :-

"महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतुदीनुसार विविध प्राधिकरणांतून व्यवस्थापन परिषदेवर निवडून आलेल्या सदस्यांचा कार्यकाल दिनांक ३१ ऑगस्ट, २०२२ रोजी संपुष्टात येत आहे. परंतु या कार्यकालात व्यवस्थापन परिषदेच्या सभांमध्ये विविध ठरावान्वये विविध विषयांसाठी समित्या नियुक्त्या केलेल्या आहेत. कित्येक समित्यांचे अद्यापही कामकाज सुरु असून सदर समित्यांचे कामकाज संपुष्टात येईपर्यंतच्या कालावधीकरिता अथवा सदरबाबत नवीन समिती नियुक्त करेपर्यंतच्या कालावधीकरिता प्रशासनाच्या विनंतीनुसार सदर समित्या कार्यरत राहतील."

सबब, उपरोक्त नमूद ठरावाप्रमाणे पुढील आवश्यक कार्यवाही करणेबाबत सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७ )
जावक क्र. एएन/ 4060 )
दिनांक : 10 OCT 2022 )

**(डॉ.प्रफुल्ल पवार)**
**कुलसचिव**

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१. सर्व विभागप्रमुख, शैक्षणिक विभाग
२. सर्व संचालक, प्रशाला
३. सर्व शाखाप्रमुख, प्रशासकीय विभाग

} सदर परिपत्रकातील आशय आपल्या विभागातील सर्व संबंधित शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी/कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून द्यावा, ही विनंती.